**नमुना अ**

**(नियम ३ पहा)**

**महाराष्ट्र जमीन महसुल (जनजातीच्या व्यक्तींना जनजातीत्तर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरीत करणे नियम १९७५ चे नियम ३ अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस)**

ज्याअर्थी, जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे खालील अनुसुची मध्ये नमुद केलेल्या श्री. जगन्नाथ तुकाराम दिवा व इतर रा. शिरसाड, ता. वसई, जि. पालघर यांच्या मालकीच्या जमिनीचा भोगाधिकार विक्रीद्वारे घेण्यासाठी अर्ज आलेला आहे. अर्जदाराने उक्त जमिनीच्या बाबतीत मोबदल्याच्या रुपाने र.रु. २६,००,०००/- (अक्षरी सव्वीस लाख रुपये मात्र) एवढी रक्कम अर्जदार यांनी देऊ केलेली आहे.

आणि ज्याअर्थी मौजे शिरसाड ता. वसई, जि. पालघर या गावामध्ये अथवा त्यापासुन पाच किलोमीटरच्या परिसरातील राहणारी जर एखादी जनजातीय व्यक्ती मालकाकडुन भोगाधिकार विक्रीद्वारे स्वीकारण्यास तयार असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ३६-अ पोट कलम (१) च्या परंतुकाच्या उपबंधान्वये तिला अग्रक्रम द्यावयाचा आहे.

त्याअर्थी आता त्या जनजातीय व्यक्ती मौजे शिरसाड, ता. वसई, जि. पालघर या गावच्या रहिवासी आहेत. अथवा त्या पासुन पाच किलोमिटरच्या परिसरामध्ये राहत आहेत आणि ज्यांची श्री. जगन्नाथ तुकाराम दिवा व इतर रा. शिरसाड, ता. वसई, जि. पालघर यांच्याकडून विक्रीद्वारे भोगाधिकार स्वीकारण्याची आणि त्यासाठी मोबदल्याच्या रुपाने र.रु. २६,००,०००/- (अक्षरी सव्वीस लाख रुपये मात्र) एवढी रक्कम देण्याची तयारी आहे. असा विक्री करुन देण्यासंबधीचा अर्ज या नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत खाली सही करणाऱ्यांकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**अ नु सू ची**

**भोगाधिकाराचे वर्णन**

| जिल्हा | तालुका | गांवाचे नाव | स.नं./ हि.नं | एकूण क्षेत्रफळ | आकारणी रु. पै. | जनजातीत्तर हस्तांतरकर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| पालघर | वसई | शिरसाड | ४३/१ | ०.६३.३० | ७.५० | श्री. पद्मशी कल्याणजी गजरा, रा. रॉयल इंड हब, कामण रोड, पोमण, ता. वसई, जि. पालघर |

**क्रमांक- मशा/महसूल/कक्ष-१/टे.१/टेनन्सी/कावि-१७७८/२०१९**
**तारीख :-२७ /०८/२०१९**
**ठिकाण : पालघर.**

**सही/-xxx**
**जिल्हाधिकारी पालघर करिता**

**प्रत - योग्य कार्यवाहीसाठी रवाना**

१) तलाठी सजा शिरसाड, ता. वसई-दवंडी रजिस्टरच्या उताऱ्यासह अहवाल पाठवावा.
   अ) अर्जातील जमिनीवर नोटीस प्रसिध्द करणे.
   ब) ५ कि.मी. परिसरातील गावामध्ये दवंडीने प्रसिध्दी देणे.
   क) तलाठी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे.
   ड) गावातील चावडीवर प्रसिध्द करणे.

**प्रत - कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी**

२) जिल्हाधिकारी कार्यालय पालघर
३) एन.आय.सी शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर
   (जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल **पत्रान्वये** सादर करणे)
४) उपविभागीय अधिकारी वसई
५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणु
६) तालुक्यातील आदिवासी संघटना
७) पंचायत समिती वसई
८) महानगरपालिका/नगरपालिका/ग्रामपंचायत कार्यालय
९) तहसिलदार वसई

जिल्हाधिकारी पालघर पालघर
जिल्हा पालघर

२७/८/२०१९

**जिल्हाधिकारी पालघर करिता**